# पोलीस आयुक्त कार्यालय

कक्ष -९ (कनिष्ठ आस्थापना / भरती कक्ष),

नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, डॉ दा.नौ.मार्ग, बृहन्मुंबई – ४००००१

दुरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११, विस्तारीत क्र. ७०४ ई-मेल– desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in


जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/३४० /२०२५, दि.२४ / ०२ /२०२५.

## मुंबई पोलीस शिपाई/पोलीस शिपाई (चालक)/पोलीस शिपाई (वाद्यवृंद) व कारागृहशिपाई भरती २०२२-२३

विषय :- मुंबई पोलीस शिपाई/पोलीस शिपाई (चालक)/पोलीस शिपाई (वाद्यवृंद) व कारागृह शिपाई भरती २०२२-२३
अंतरिम निवड यादीमध्ये समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी त्यांच्याकडील कागदपत्रांच्या PDF फाईल सबमीट करणेबाबत.

संदर्भ :- क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पो.शि.भरती २०२२-२३/१७३/२०२३, दिनांक ०६/०६/२०२४.

मुंबई पोलीस शिपाई/पोलीस शिपाई (चालक)/पोलीस शिपाई (वाद्यवृंद) व कारागृह शिपाई भरती २०२२-२३ करिता पोलीस शिपाई पदाचे २५७२, पोलीस शिपाई (चालक) ९१७, पोलीस शिपाई (वाद्यवृंद) २४ व दक्षिण विभाग, कारागृह शिपाई ७१७ उमेदवारांची अंतरिम निवड यादी दिनांक १७/०२/२०२५ रोजी mumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

अंतरिम निवड यादीत समाविष्ट असलेल्या उमेदवारांची सशस्त्र पोलीस, कोळे कल्याण कलीना, सांताक्रुझ, मुंबई येथे पोलीस शिपाई व पोलीस शिपाई (चालक) पदाची व सशस्त्र पोलीस, वरळी, मुंबई येथे कारागृह शिपाई व पोलीस शिपाई (वाद्यवृंद) पदाची कागदपत्र पडताळणी लवकरच घेण्यात येणार असून, कागदपत्र पडताळणीच्या वेळापत्रकाबाबत स्वतंत्रपणे प्रसिध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येईल.

उमेदवारांनी त्यांच्या आवेदन अर्जात नमूद केलेली सामाजिक/समांतर आरक्षण व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या नोंदीप्रमाणे सदर प्रमाणपत्रांच्या PDF तयार करुन https://results.iroams.com/Mumbai_police/ या संकेतस्थळावर जाऊन सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या PDF फाईल दिनांक २४/०२/२०२५ ते २८/०२/२०२५ अखेरपर्यंत जमा (Attached) कराव्या. जे उमेदवार त्यांच्या कागदपत्रांच्या PDF फाईल जमा (Attached) करणार नाहीत त्यांची कागदपत्र पडताळणी करण्यात येणार नाही.

याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

पोलीस आयुक्त मुंबई

( नितीन पवार )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय.